

## SAF चा PCA पर्यंतचा प्रवास (भाग १)

**सौ. सायली भोईर**
मुख्य कार्यकारी व सचिव
दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन लि.

मंडळी, आपणांस माहितच आहे की, भारतीय रिझर्व्ह बँकेने दि. ०१ मार्च, २०१२ रोजीच्या पत्रकाद्वारे नागरी सहकारी बँकांवरील पर्यवेक्षकीय कारवाईकरिता आकृतीबंध (Supervisory Action Framework) तयार केला होता. या आकृतीबंधानुसार जर बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण ९% च्या खाली गेल्यास, बँकेला सलग २ वर्षे तोटा झाल्यास, ढोबळ अनुत्पादित कर्जाचे प्रमाण १०% च्या वर गेल्यास, सीडी रेशोचे प्रमाण ७०% पेक्षा अधिक झाल्यास आणि बँकेच्या एकूण २० मोठ्या ठेवीदारांच्या ठेवी त्या बँकेच्या एकूण ठेवीच्या ३०% हून अधिक असल्यास इ. यापैकी कोणत्याही एका किंवा अधिक निकषांचे उल्लंघन झाल्यास बँकांवर SAF अंतर्गत रिझर्व्ह बँकेकडून पर्यवेक्षकीय कारवाई केली जात होती. त्यानुषंगाने अनेक निर्बंध बँकांवर लादले जात होते. या निर्बंधामध्ये खालील गोष्टींचा प्रामुख्याने समावेश होता.




१) बँकेला लाभांश वाटप करता येत नव्हते.
२) बँकेस कार्यक्षेत्र विस्तार करता येत नव्हता किंवा नवीन शाखा उघडता येत नव्हती.
३) बँकेस नवीन व्यवसायात प्रवेश करता येत नव्हता.
४) रिझर्व्ह बँकेच्या परवानगीशिवाय रु. १०,०००/- पेक्षा जास्त भांडवली खर्च बँकेस करता येत नव्हता.
५) बँकेस देणगी देता येत नव्हती.
६) बँकेच्या प्रशासकीय खर्चावर बंधने येत होती.

याव्यतिरिक्त बँकेची वैयक्तिक तथा सामूहिक कर्ज मर्यादा देखील काही ठराविक टक्क्याने कमी केली जात होती. तसेच बँकेस त्यांनी कर्ज दिलेल्या काही क्षेत्रास उदा. कॅपिटल मार्केट, रिअल इस्टेट तथा Non SLR investment मधील exposure कमी करण्यास सांगण्यात येत होते. शिवाय संबंधित बँकेस ठेवींचा व्याजदर स्टेट बँक ऑफ इंडियाच्या ठेवींच्या व्याजदराशी सुसंगत ठेवावा लागत होता इ.

फेडरेशनच्या सातत्याच्या पाठपुराव्यामुळे प्रथमत: दि. १७ ऑक्टोबर, २०१२ रोजीच्या परिपत्रकाद्वारे भांडवली निधीच्या ७५% रक्कम सीडी रेशो काढताना गृहीत धरण्यात आली. कालांतराने सीडी रेशोचा निकषही काढून टाकण्यात आला. तद्नंतर Gross NPA च्या टक्केवारीचा निकष काढून टाकण्यात येऊन त्याऐवजी Net NPA ची टक्केवारी घेण्यात आली.

SAF च्या शेवटच्या परिपत्रकात (दि. ०६ जानेवारी, २०२०) रिझर्व्ह बँकेने, वरील ट्रिगर पॉइंट्स वगळता बँकेचे इतरही महत्त्वाचे निर्देशांक जरी खालावले किंवा सुप्रशासनात गंभीरता अथवा दोष आढळले, तरी बँकेवर पर्यवेक्षकीय कारवाई केली जाणार, असे स्पष्ट नमुद केले होते. तद्नंतर वरील निकषांवर (thresholds / trigger

points) आधारित नागरी सहकारी बँकांवर रिझर्व्ह बँकेकडून कारवाई करण्यात येत होती. तथापि दि. २६ जुलै, २०२४ रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार सदरहू SAF च्या ऐवजी आता PCA बँकांना लागू केले जाणार आहे.

PCA ज्याचे संपूर्ण नाव 'Prompt Corrective Action' असे आहे. या फ्रेमवर्क अंतर्गत सध्या टिअर २, ३ आणि ४ वर्गातील नागरी सहकारी बँकांचा समावेश करण्यात आलेला आहे. या फ्रेमवर्क मधून सर्वसमावेशक निर्बंध असलेल्या नागरी सहकारी बँकांना वगळण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे टिअर १ मधील नागरी सहकारी बँकांना जरी सध्या PCA फ्रेमवर्क लागू करण्यात आलेले नसले तरी सध्याच्या SAF अंतर्गत त्यांच्यावर ज्यादा देखरेख ठेवली जाणार आहे. तद्नंतर PCA अंतर्गत असलेल्या टिअर १ मधील नागरी सहकारी बँकांच्या अपवादाची पूर्नतपासणी केली जाईल.

नागरी सहकारी बँकांना PCA लागू करण्याचा उद्देश म्हणजे रिझर्व्ह बँकेस या बँकांवर वेळीच पर्यवेक्षकीय देखरेख ठेवता येईल आणि आपली आर्थिक परिस्थिती पूर्नस्थितीत वा चांगली राखण्यासाठी योग्य त्या उपाययोजना या बँकांना वेळीच करता येतील. शिवाय या फ्रेमवर्क अंतर्गत नमुद केलेल्या योग्य कृती व्यतिरिक्त अन्य कारवाई करण्याचा मार्गही रिझर्व्ह बँकेस खुला राहणार आहे.

PCA फ्रेमवर्क अंतर्गत नमुद केलेल्या तरतुदींची अंमलबजावणी दि. ०१ एप्रिल, २०२५ पासून करण्यात येणार आहे. ज्या नागरी सहकारी बँकांवर सध्या SAF अंतर्गत कारवाई सुरु आहे, त्यांच्यावर सध्या असलेले निर्बंध सुरुच राहतील. तद्नंतर Case to Case Basis वर रिझर्व्ह बँकेकडून या बँका एकतर SAF मधून बाहेर निघतील अथवा त्यांचेवर PCA अंतर्गत कारवाई सुरु राहील.

PCA फ्रेमवर्कअंतर्गत देखरेख ठेवण्यासाठी भांडवल, मालमत्तेचा दर्जा आणि नफा क्षमता हे महत्त्वाचे घटक राहणार आहेत आणि ह्या घटकांचे निर्देशक प्रामुख्याने भांडवल पर्याप्तता प्रमाण, निव्वळ अनुत्पादित कर्जाची टक्केवारी व निव्वळ नफा हे राहणार आहेत.

**PCA matrix – Parameters, Indicators and Risk Thresholds**

| Parameter | Indicator | Risk Threshold 1 | Risk Threshold 2 | Risk Threshold 3 |
|---|---|---|---|---|
| Capital (Breach of CRAR) | CRAR – Minimum Regulatory Requirement, as applicable | Up to 250 bps below the Indicator prescribed at column (2) | More than 250 bps but not exceeding 400 bps below the Indicator prescribed at column (2) | In excess of 400 bps below the Indicator prescribed at column (2) |
| Asset Quality | Net Non-Performing Advances (NNPA) Ratio | >=6.0% but <9.0% | >=9.0% but < 12.0% | >=12.0% |
| Profitability | Net profit | Incurred losses during two consecutive years | -- | -- |
| For Tier 2 to 4 UCBs as per the glide path provided for achieving the regulatory minimum CRAR of 12% by March 31, 2026. | | | | |

PCA अंतर्गत जोखीम सीमा (मर्यादा) १, २ व ३ नमुद करण्यात आलेल्या आहेत.

१) जर किमान भांडवल पर्याप्तता प्रमाण १०% एखाद्या नागरी सहकारी बँकेस लागू असेल, तर जोखीम सीमा १ नुसार (३ क्रमांकाचा स्तंभ) भांडवल पर्याप्तता प्रमाण १०% चे खाली, परंतु ७.५% चे वर असल्यास PCA फ्रेमवर्क च्या जोखीम सीमा १ मध्ये नमुद केलेले निर्बंध संबंधित बँकेस लागू होतील.

उदा.

$\frac{२५०}{१००}$ = २.५% ∴१०%-२.५% = ७.५%

२) जोखीम सीमा २ नुसार (४ क्रमांकाचा स्तंभ) भांडवल पर्याप्तता प्रमाण ७.५ चे खाली, परंतु ६% चे वर असल्यास PCA फ्रेमवर्क च्या जोखीम सीमा २ मध्ये नमुद केलेले निर्बंध संबंधित बँकेस लागू होतील.

उदा.

$\frac{२५०}{१००}$ = २.५% ∴१०%-२.५% = ७.५%

$\frac{४००}{१००}$ = ४% ∴ १०%-४% = ६%

३) जोखीम सीमा ३ नुसार (५ क्रमांकाचा स्तंभ) भांडवल पर्याप्तता प्रमाण ६% च्या खाली गेल्यास, PCA फ्रेमवर्कच्या जोखीम सीमा ३ मध्ये नमुद केलेले निर्बंध संबंधित बँकेस लागू होतील.

४) निव्वळ अनुत्पादित कर्जाची टक्केवारी जोखीम सीमा १ करिता ६% किंवा त्याचेवर, परंतु ९% पेक्षा कमी, जोखीम सीमा २ करिता ९% किंवा त्याचेवर, परंतु १२% पेक्षा कमी व जोखीम सीमा ३ करिता १२% चे वर असल्यास या जोखीम सीमेअंतर्गत नमुद केलेले निर्बंध संबंधित नागरी सहकारी बँकांना लागू होतील.

५) त्याचप्रमाणे जर एखाद्या बँकेस सलग २ वर्षे तोटा झालेला असेल तर त्यांना PCA फ्रेमवर्कमधील जोखीम सीमेंतर्गत नमुद केलेले निर्बंध लागू होतील.

नागरी सहकारी बँकांना त्यांच्या लेखापरीक्षित आर्थिक परिणामानुसार आणि/किंवा रिझर्व्ह बँकेकडून होत असलेल्या सततच्या पर्यवेक्षकीय मुल्यांकनानुसार PCA फ्रेमवर्कमध्ये समाविष्ट केले जाईल. तथापि वर्षभरात परिस्थितीनुसार केव्हाही व कोणत्याही बँकेवर PCA लादण्याची रिझर्व्ह बँकेस मुभा असेल. त्याचप्रमाणे जरी PCA फ्रेमवर्क मध्ये नमुद असलेल्या निकषांच्या आधारावर बँकेवर पर्यवेक्षकीय कारवाई होणार असली, तरी बँकेच्या एखाद्या महत्त्वाच्या आर्थिक मापदंडात तणाव (stress) जाणवत असेल अथवा सुशासनाच्या गंभीर मुद्यावरुन रिझर्व्ह बँक संबंधित बँकेवर योग्य ती कारवाई करेल.

एखाद्या बँकेवर जर PCA फ्रेमवर्क अंतर्गत निर्बंध लागले, तर सदरहू निर्बंध केवळ खालील बाबींची पूर्तता केल्यावरच काढून टाकण्यात येतील.

अ) वर्षभरातील चार तिमाही आर्थिक पत्रकांमध्ये, ज्यापैकी एक लेखापरीक्षकाने प्रमाणित केलेले असले पाहिजे (व त्याची तपासणी रिझर्व्ह बँकेकडूनही झाली पाहिजे.)

ब) बँकेच्या महत्त्वाच्या आर्थिक घटकांमध्ये शाश्वत सुधारणेच्या तपासणीसह रिझर्व्ह बँकेस पर्यवेक्षकीय समाधान दिल्यास...

वरील दोन बाबींची पूर्तता झाल्यावरच बँकेवरील PCA फ्रेमवर्क अंतर्गत करण्यात आलेली कारवाई रिझर्व्ह बँकेकडून मागे घेतली जाईल.

एखाद्या बँकेवर PCA अंतर्गत कारवाई सुरु झाल्यास त्यांचेवर खालीलप्रमाणे निर्बंध लावण्यात येतात, तसेच त्यांना खालील सक्तीची कार्यवाही करण्यास सांगण्यात येते.

| तपशील | सक्तीची कारवाई | विवेकी कारवाई |
|---|---|---|
| जोखीम सीमा १ | १)सध्याच्या सभासदांकडून भागभांडवल जमा करणे किंवा रोखे आणि इतर प्रकारची भांडवली दस्तऐवज जारी करणे.<br>२)लाभांश अथवा अनुदान देण्यावर निर्बंध<br>३)तांत्रिक सुधारणेव्यतिरिक्त इतर भांडवली खर्चावर निर्बंध | सामाईक यादी<br>१. विशेष पर्यवेक्षकीय कारवाई<br>२. धोरणासंबंधी कारवाई<br>३. सुप्रशासनासंबंधी कारवाई<br>४. भांडवलासंबंधी कारवाई<br>५. पत जोखीमसंबंधी कारवाई |
| जोखीम सीमा २ | वरील सक्तीच्या कारवाई व्यतिरिक्त बँकेच्या शाखा विस्तारावर निर्बंध टाकण्यात येतील | ६. बाजारसंबंधी कारवाई<br>७. मानव संसाधनसंबंधी कारवाई |
| जोखीम सीमा ३ | वरील जोखीम सीमा १ व २ मध्ये नमुद केलेल्या सक्तीच्या कारवाई व्यतिरिक्त बँकेच्या एकूण ठेवीच्या वाढीवर निर्बंध घालण्यात येतील. | ८. नफासंबंधी कारवाई<br>९. कामकाजाशी/व्यवसायाशी संबंधित कारवाई<br>१०. सर्वसमावेशक निर्बंध लादणे / बँकेचा परवाना रद्द करणे<br>११. अन्य कारवाई |

अशाप्रकारे PCA मध्ये नमुद केलेल्या आर्थिक निकषांचे उल्लंघन झाल्यास नागरी सहकारी बँकांवर या फ्रेमवर्क अंतर्गत रिझर्व्ह बँकेकडून पर्यवेक्षकीय कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे यापुढे प्रत्येक बँकेने प्रत्येक तिमाहीत आपला ताळेबंद व त्यातील आर्थिक घटक उत्तम व सक्षम राहतील याकडे बारकाईने लक्ष दिले पाहिजे.

(क्रमश:)

(भाग २: पुढील अंकात)

*****


**फेडरेशनच्या कार्यालयात खालील पुस्तके विक्रीसाठी उपलब्ध आहेत:**













